**<u>माझी वसुंधरा अभियान-३.०</u>**
**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : क्र - मावअ २०२२/ प्र.क्र. १०८/ तां.क.१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : ७ नोव्हेंबर, २०२२

<u>वाचा</u> : (१) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्रमांक अभियान-२०२०/ प्र.क्र.१३४/ तां.क.-१, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२०
(२) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्रमांक अभियान-२०२१/ प्र.क्र.१६/ तां.क.-१, दिनांक २१ जानेवारी, २०२१
(३) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्रमांक मावआ-२०२१/ प्र.क्र.७५/ तां.क.-१, दिनांक २२ डिसेंबर, २०२१

**<u>प्रस्तावना:</u>**

पर्यावरणातील वातावरणीय बदलाचे महत्व लक्षात घेता, पर्यावरण विभागाचा **“पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग”** असा नामबदल करण्यात आला आहे. निसर्गाशी असलेली कटिबद्धता निश्चित करण्यासाठी पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वावर पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग कार्य करीत आहे.

२. पर्यावरणाचे जतन, संवर्धन व संरक्षण करण्यासाठी “माझी वसुंधरा (माय अर्थ)” हा अभिनव उपक्रम विभागाने हाती घेतला आहे. जो निसर्गाच्या “पंचमहाभूते” नावाच्या पाचही घटकांवर लक्ष केंद्रित करतो. त्यात भूमी (जमीन), जल (पाणी), वायू (हवा), अग्नी (ऊर्जा), आकाश (संवर्धन) यांचा समावेश आहे. या उपक्रमातून वातावरणीय बदल आणि पर्यावरणाच्या समस्यांबद्दल नागरिकांना जागरूक करून त्यांना पर्यावरणाच्या सुधारणेप्रती प्रयत्न करण्यात येतात.

३. पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वावर आधारित **“माझी वसुंधरा अभियान”** राज्यामध्ये दिनांक २ ऑक्टोबर, २०२० पासून राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नागरी स्थानिक संस्था व ग्राम पंचायती या स्थानिक संस्थांची पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या योजना प्रभावीपणे व मिशन मोड पध्दतीने राबविण्याची स्पर्धा घेण्यात येते.

४. माझी वसुंधरा अभियानाच्या पहिल्या वर्षात राज्यामधील ६८६ स्थानिक स्वराज्य संस्थांनी (अमृत शहरे ४३ , नगरपरिषदा २२२, नगरपंचायती १३० व ग्रामपंचायती २९१ ) नोंदणी करून हे अभियान दिनांक २ ऑक्टोबर, २०२० ते दिनांक १५ एप्रिल, २०२१ या कालावधीत राबविण्यात आले आहे. या अभियानात निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी १५०० गुण ठेवण्यात आले होते.

५. माझी वसुंधरा अभियानात स्थानिक स्वराज्य संस्थांनी अभियान कालावधीत केलेल्या कामाचे मुल्यमापन (डेस्कटॉप मुल्यमापन) दिनांक १६ एप्रिल, २०२१ ते ३१ मे, २०२१ या कालावधीत त्रसस्त यंत्रणे मार्फत करण्यात आले. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे संबंधित स्थानिक संस्थेमध्ये प्रत्यक्ष जावून मुल्यमापन करणे शक्य नसल्याने या डेस्कटॉप मुल्यमापनामध्ये ज्या स्थानिक संस्था सर्वोत्तम ठरल्या त्या स्थानिक संस्थांचे आभासी मुल्यमापन (Virtual Assessment) विभागांतर्गत गठित समिती मार्फत करण्यात आले. या मुल्यमापनातील एकूण गुणांच्या आधारे विजेते घोषीत करून सर्व विजेत्यांसोबत विभागीय व जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांचा पर्यावरण दिनी म्हणजे, दिनांक ५ जून, २०२१ रोजी आयोजित माझी वसुंधरा अभियान सन्मान ऑनलाईन सोहळयात सन्मानित करण्यात आले आहे.

६. माझी वसुंधरा अभियान २.० ची सुरवात पर्यावरण दिना दिवशी म्हणजे दिनांक ५ जून, २०२१ रोजी करण्यात आली. या अभियानात दुसऱ्या वर्षात नोंदणी करण्यासाठी (१) अमृत, (२) नगर परिषद, (३) नगर पंचायत, (४) ग्राम पंचायत ०१ व (५) ग्राम पंचायत ०२ असे ०५ गट ठेवण्यात आले होते. माझी वसुंधरा अभियान २.० मध्ये ४०६ नागरी स्थानिक संस्था व ११,५६२ ग्राम पंचायतीनी नोंदणी झाली होती.

७. माझी वसुंधरा अभियान २.० अंतर्गत स्थानिक संस्थांना काम करण्यासाठी दिनांक १६ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२२ एवढा कालावधीत देण्यात आला होता. दिनांक १ एप्रिल ते ३० एप्रिल, २०२२ या कालावधीत स्थानिक संस्थांनी केलेल्या कामाचे डेस्क्टॉप असेसमेंट त्रयस्त यंत्रणे मार्फत करण्यात आले. तर, दिनांक १ मे, ते ३१ मे २०२२ या कालावधीत फिल्ड असेसमेंट त्रयस्त यंत्रणे मार्फत करण्यात आले. या मुल्यमापनातील एकूण गुणांच्या आधारे राज्यस्तरावरील व विभागस्तरावरील विजेते घोषीत करून सर्व विजेत्यांसोबत विभागीय व जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांचा पर्यावरण दिनी म्हणजे, दिनांक ५ जून, २०२२ रोजी आयोजित माझी वसुंधरा अभियान सन्मान सोहळयात सन्मानित करण्यात आले आहे.

८. माझी वसुंधरा अभियानांतर्गत स्थानिक संस्थांनी पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या विविध योजनांची मागील दोन वर्षात प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यामुळे झालेली फलनिष्पती

विचारात घेवून **“माझी वसुंधरा अभियान ३.०” ची** अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्याची व माझी वसुंधरा अभियान ३.० ची टूलकीट निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**<u>शासन निर्णय :</u>**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या सर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित **माझी वसुंधरा अभियान-३.०** हे राज्यातील माझी वसुंधरा अभियानांतर्गत नोंदणी केलेल्या **१६,८२४** स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबविण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच, माझी वसुंधरा अभियान ३.० करिता स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकसंख्या निहाय खालील प्रमाणे गट करून त्यानुसार स्पर्धेची अंमलबजावणी करण्यासही शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | | लोकसंख्या निहाय गट | समाविष्ट स्थानिक संस्थांची संख्या |
|---|---|---|---|
| **(अ)** | **नागरी स्थानिक स्वराज्य संस्था : ४११** | | |
| (०१) | अमृत शहरे (४३) | १० लक्ष पेक्षा अधिक लोकसंख्या | १० |
| (०२) | | ३ लक्ष पेक्षा अधिक परंतु १० लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या | १७ |
| (०३) | | १ लक्ष पेक्षा अक्षिक परंतु ३ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या | १६ |
| (०४) | नगरपरिषद व नगर पंचायत (३६८) | ५० हजार पेक्षा अधिक परंतु १ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या | ४७ |
| (०५) | | २५ हजार पेक्षा अधिक परंतु ५० हजार पेक्षा कमी लोकसंख्या | ११८ |
| (०६) | | १५ हजार पेक्षा अधिक परंतु २५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या | ९४ |
| (०७) | | १५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या | १०९ |
| **(ब)** | **ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था : १६,४१३** | | |
| (०८) | ग्राम पंचायती | १० हजार पेक्षा अधिक लोकसंख्या | ३६६ |
| (०९) | | ५ हजार पेक्षा अधिक व १० हजार पेक्षा कमी लोकसंख्या | १,०६७ |
| (१०) | | २.५ हजार पेक्षा अधिक व ५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या | ३,३५९ |
| (११) | | २.५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या | ११,६२१ |
| | | **एकूण (अ) + (ब)** | **१६,८२४** |

२.	या अभियानांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांनी पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी खाली दिलेल्या विगतवारीनुसार **अमृत गटासाठी ७६०० व अमृत गट वगळून इतर गटांसाठी ७५००** गुण ठेवण्यात येत आहेत:-

| विषय / गुण | भूमी / Earth | वायू / Air | जल / water | अग्नी / Energy | आकाश / Enhancement | माझी वसुंधरा २.० मधील कामाचे सातत्य राखण्यासाठी | माझी वसुंधरा ३.० चा एमआयएस दिनांक १ ते ५ एप्रिल मध्ये दाखल करण्यासाठी (Early Bird) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **नागरी स्थानिक संस्था (अमृत) (७६००)** | १९०० | १२०० | ११५० | १००० | १९५० | २०० | २०० |
| **नागरी स्थानिक संस्था (अमृत वगळून) (७५००)** | १९०० | ११०० | ११५० | १००० | १९५० | २०० | २०० |
| **ग्राम पंचायती (७५००)** | १५५० | ११०० | १३०० | १२०० | १९५० | २०० | २०० |

३.	माझी वसुंधरा अभियानांतर्गत नागरी व ग्रामीण स्थानिक संस्थांमध्ये राबवावयाच्या उपरोक्त पंचतत्वांतर्गत उपक्रमांचा विस्तृत तपशील खालील तक्त्यात नमूद केला आहे:-

| अ.क्र. | अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी | गुण | |
|---|---|---|---|
| | | नागरी | ग्रामीण |
| I | **भूमी** | | |
| **१** | **हरित अच्छादन आणि जैवविविधता** | **१,१५०** | **८००** |
| (१) | लावलेल्या व जगलेल्या झाडांची एकूण संख्या | ३०० | ३०० |
| (२) | वृक्ष गणना व जिओ टॅगींग | १०० | १०० |
| (३) | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ ची अंमलबजावणी | १५० | - |
| (४) | रोपवाटिकांची निर्मिती | १०० | १०० |
| (५) | नव्याने निर्माण केलेल्या हरित क्षेत्रांचा विकास (संख्या) (उदा. अमृत वने, सार्वजनिक उद्याने) | १०० | १०० |
| (६) | वृक्ष आराखडा: किमान ३३% वृक्ष आच्छादनाचे ध्येय साध्य करण्या करिता आराखडा | २०० | - |
| (७) | जैवविविधता नोंदवही तयार करणे. ( बायोडायव्हरसिटी रजिस्टर) | १०० | १०० |
| (८) | माती च्या माध्यमातून कार्बन सिंक करणे | १०० | १०० |
| | **एकूण** | **१,१५०** | **८००** |
| **२** | **घनकचरा व्यवस्थापन** | **७५०** | **७५०** |
| (१) | घनकचऱ्याचे संकलन, निर्मितीच्या जागी विलगीकरण याची टक्केवारी | १०० | ५० |
| (२) | ओल्या कचऱ्यावरील प्रक्रीया | ५० | ५० |
| (३) | सुका कचऱ्याची अंत्तीम विल्हेवाट | ५० | १०० |
| (४) | जुन्या साठलेल्या कचऱ्यावर (Legacy Waste) शास्त्रोक्त प्रक्रिया | १०० | १०० |
| (५) | प्लास्टिक कचरा व्यवस्थापन | ३०० | ३०० |
| (६) | जैव वैद्यकीय (बायोमेडिकल) कचरा व्यवस्थापन | ५० | ५० |

| **अ.क्र.** | **अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी** | **गुण** | |
|---|---|---|---|
| | | **नागरी** | **ग्रामीण** |
| (७) | ई कचरा व्यवस्थापन | ५० | ५० |
| (८) | स्थानिक स्वराज्य संस्थेचा हागणदारीमुक्तीचा दर्जा | ५० | ५० |
| | **एकूण** | **७५०** | **७५०** |
| | **भूमी -एकूण** | **१,९००** | **१,५५०** |
| II | **वायू (गुण : अमृत गटासाठी १२०० व इतर गटांसाठी ११००)** | | |
| (१) | पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल मंत्रालयाने मान्यता दिलेल्या प्रयोगशाळांमार्फत परिक्षण करण्यात आलेली वायू गुणवत्ता | १५० | १५० |
| | **वायू प्रदूषण कमी करणे** | | |
| (२) | फटाक्यांवर बंदी घालण्याकरिता पुढाकार | १५० | १५० |
| (३) | नागरिकांमध्ये चांगल्या सवयींना प्रोत्साहन- सायकलिंग ट्रॅकची निर्मिती आणि पादचारी मार्ग / कृषी कचरा व्यवस्थापन | १०० | १०० |
| (४) | बांधकाम व पाडकाम कचऱ्याचे व्यवस्थापन / गॅस कनेक्शन | १०० | १०० |
| | **इलेक्ट्रिक वाहन धोरणाची प्रभावी अंमलबजावणी** | | |
| (५) | इलेक्ट्रिक वाहन धोरणाची प्रभावी अंमलबजावणी : इलेक्ट्रिक वाहनांची संख्या | ५०० | ५०० |
| (६) | इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशनची संख्या | १०० | १०० |
| (७) | **रेस टू झिरो** च्या निकषांची पूर्तता (**फक्त अमृत गटासाठी**) | १०० | - |

| अ.क्र. | अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी | गुण | |
|---|---|---|---|
| | | नागरी | ग्रामीण |
| | **वायु- एकूण अमृत गटासाठी** | **१,२००** | **-** |
| | **वायु- एकूण अमृत गट वगळून इतर गटांसाठी** | **१,१००** | **१,१००** |
| III | **जल** | **१,१५०** | **१,३००** |
| (१) | जल संसाधन संवर्धन आणि पुनरुज्जीवन | १७५ | ३०० |
| | **पिण्याच्या पाण्याच्या वापराचे निरीक्षण व त्यामध्ये कपात** | | |
| (२) | पाण्याचे लेखापरीक्षण / पाण्याचे लेखापरीक्षण व अंदाजपत्र करणे | १५० | १०० |
| | **रेन वॉटर हारवेस्टिंग व परकोलेशन** | | |
| (३) | सार्वजनिक इमारतीवर रेन वॉटर हारवेस्टिंग | १५० | १५० |
| (४) | रेन वॉटर परकोलेशन पिट | २५ | २५ |
| (५) | विहिरींचे पुनरुज्जीवन | १०० | १०० |
| (६) | सांडपाणी प्रक्रिया व प्रक्रिया करण्यात आलेल्या पाण्याचा पुनर्वापर / ठिबक सिंचनाची सुविधा उपलब्ध असलेली शेती | २०० | २०० |
| (७) | जल जीवन मिशन | - | ७५ |
| (८) | सण / उत्सवांच्या वेळी होणारे जलप्रदूषण कमी करणे | १०० | १०० |
| (९) | पर्यावरणपूरक मूर्तीचा प्रचार व प्रसार | १५० | १५० |
| (१०) | पाणथळ जागांचे संवर्धन | १०० | १०० |
| | **जल -एकूण** | **१,१५०** | **१,३००** |
| IV | **अग्नी** | **१,०००** | **१,२००** |
| (१) | नूतनीकरणयोग्य उर्जा स्त्रोतांच्या वापरास प्रोत्साहन | २०० | २०० |

| अ.क्र. | अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी | गुण | |
|---|---|---|---|
| | | नागरी | ग्रामीण |
| | **कार्बन उत्सर्जन कमी असलेल्या उर्जा स्त्रोतांचा अवलंब** | | |
| (२) | एलईडी दिवे लावणे | १०० | १०० |
| (३) | सार्वजनिक इमारतींच्या छतावर/कॉम्प्लेक्समध्ये सौर उर्जा प्रकल्प | ३०० | ३०० |
| (४) | हरीत इमारतींची संख्या / नुतनीकरणयोग्य उर्जेचा स्त्रोत म्हणून बायोगॅसचा वापर | १०० | २०० |
| (५) | सार्वजनिक इमारती व सुविधांचे ऊर्जा ऑडिट आणि ऊर्जा बचत प्रयत्न / एकूण सौर पंपांची संख्या | १०० | २०० |
| (६) | सोलर वॉटर हीटर | २०० | २०० |
| | **अग्नी -एकूण** | **१,०००** | **१,२००** |
| V | **आकाश (१,९५०)** | | |
| (१) | घेतलेल्या #ई प्लेज व त्या #ई प्लेज ची पूर्तता ( Upkeep) | ४०० | ४०० |
| (२) | जनजागृती कार्यक्रम आयोजित करून माझी वसुंधराची प्रचार पसिद्धी | १०० | १०० |
| (३) | माझी वसुंधराला प्रोत्साहन देण्यासाठी स्थानिक स्पर्धा/स्पर्धेचे आयोजन | १०० | १०० |
| (४) | पर्यावरण दूत | १०० | १०० |
| (५) | पर्यावरण सुधारणा / संरक्षणाबाबत सोशल मीडियाच्या माध्यमातून माझी वसुंधराच्या अनुषंगाने जनजागृती | २०० | २०० |
| (६) | सार्वजनिक ठिकाणी माझी वसुंधरा तत्वे दर्शवणाऱ्या बाबी रस्ते, कारंजे, हरित क्षेत्र इत्यादीच्या माध्यमातून प्रचार प्रसिध्दी | ५०० | ५०० |

| **अ.क्र.** | **अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी** | **गुण** | |
|---|---|---|---|
| | | **नागरी** | **ग्रामीण** |
| (७) | माझी वसुंधराच्या उपक्रमांमध्ये तरुण पिढीचा समावेश | १०० | १०० |
| (८) | पर्यायी निधी मिळवण्याचे मार्ग : CSR, सामुदायिक सहभाग व इतर | २०० | २०० |
| (९) | माझी वसुंधरा च्या तत्वांशी एकात्मता | २०० | २०० |
| (१०) | माझी वसुंधरा- नाविण्यपूर्णता | ५० | ५० |
| | **आकाश- एकूण** | **१,९५०** | **१,९५०** |
| | **भूमी, वायू, जल, अग्नी, आकाश एकूण (अमृत गटाकरिता)** | **७,२००** | |
| | **भूमी, वायू, जल, अग्नी, आकाश एकूण (अमृत गट वगळता)** | **७,१००** | |
| | **माझी वसुंधरा १.० व २.० मध्ये केलेल्या कामांची पूर्तता (Upkeep)** | | |
| **(१)** | माझी वसुंधरा १.० व २.० च्या अंतर्गत जागवलेल्या वृक्षांची संख्या | २०० | २०० |
| | **माझी वसुंधरा १.० व २.० - पूर्तता एकूण** | **२००** | |
| | **माझी वसुंधरा ३.० चा एमआयएस दिनांक १ ते ५ एप्रिल मध्ये दाखल करण्यासाठी (Early Bird)** | **२००** | |
| | **एकंदरीत एकूण (अमृत गटासाठी)**<br>**एकंदरीत एकूण (अमृत गट वगळता)** | **७,६००**<br>**७,५००** | |

४. उपरोक्त विगतवारीनुसार गुणांचे सविस्तर वितरण व मुल्यांकन या बाबतची कार्यपध्दती दर्शविणारी माझी वसुंधरा अभियान ३.० ची नागरी व ग्रामीण स्थानिक संस्थांसाठीची टुलकिट अनुक्रमे ***परिशिष्ट-१ व परिशिष्ट-२ म्हणून*** या शासन निर्णया सोबत ***जोडली आहे.***

५. **स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सदर अभियान प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी संबंधित आयुक्त, महानगरपालिका, मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत व ग्रामसेवक, ग्राम पंचायत**

**यांची राहील. तर,जिल्हयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रमुख म्हणून संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी, जिल्हयाच्या ग्रामीण संस्थांचे प्रमुख म्हणून संबंधित जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित महसूली विभागाचे प्रमुख म्हणून विभागीय आयुक्त यांनी त्यांचे विभागातील / जिल्हयातील स्थानिक संस्थांना प्रोत्साहन देवून त्यांच्याकडून सदर अभियानात उच्चत्तम कामगिरी करून घेण्याची जबाबदारी सोपविण्यात येत आहे.**

६. सदर अभियानाचा कालावधी दिनांक १ एप्रिल, २०२२ ते दिनांक ३१ मार्च, २०२३ असा राहिल. या अभियानांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थेने केलेल्या कामाचे डेस्कटॉप मुल्यमापन दिनांक ६ एप्रिल, २०२३ ते दिनांक ३१ एप्रिल, २०२३ या कालावधीत करण्यात येईल व डेस्कटॉप मुल्यमापनात यशस्वी ठरलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे फिल्ड असेसेमेंट दिनांक २ मे, २०२३ ते २५ मे, २०२३ या कालावधीत त्रसस्त यंत्रणां मार्फत करण्यात येईल व त्याचा निकाल जागतिक पर्यावरण दिनी म्हणजे दिनांक ५ जून, २०२३ रोजी जाहिर करून बक्षिस वितरण करण्यात येईल.

७. माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांना पुढे दर्शविल्या प्रमाणे बक्षिसे देण्यात येतील:

<u>राज्यस्तर (State level):</u>

(अ) **स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी :**

| **अ.क्र.** | | **लोकसंख्या निहाय गट** | **गटामधील गुणानुक्रमानुसार उच्चत्तम कामगिरी करणारी** | **भूमी या थीमॅटिक क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी** |
|---|---|---|---|---|
| (अ) | **नागरी स्थानिक स्वराज्य संस्था : ४११** | | | |
| (०१) | अमृत शहरे (४३) | १० लक्ष पेक्षा अधिक लोकसंख्या : १० | ३ शहरे | १ शहर |
| (०२) | | ३ लक्ष पेक्षा अधिक परंतु १० लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या : १७ | ३ शहरे | १ शहर |
| (०३) | | १ लक्ष पेक्षा अक्षिक परंतु ३ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या : १६ | ३ शहरे | १ शहर |
| (०४) | नगरपरिषद व नगर पंचायत (३६८) | ५१ हजार पेक्षा अधिक परंतु १ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या : ४७ | ३ शहरे | १ शहर |
| (०५) | | २५ हजार पेक्षा अधिक परंतु ५० हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ११८ | ३ शहरे | १ शहर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (०६) | | १५ हजार पेक्षा अधिक परंतु २५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ९४ | ३ शहरे | १ शहर |
| (०७) | | १५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : १०९ | ३ शहरे | १ शहर |
| **(ब)** | **ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था : १६,३९८** | | | |
| (०८) | ग्राम पंचायती | १० हजार पेक्षा अधिक लोकसंख्या: ३६६ | ३ ग्राम पंचायती | १ ग्राम पंचायत |
| (०९) | | ५ हजार पेक्षा अधिक व १० हजार पेक्षा कमी लोकसंख्या : १,०७० | ३ ग्राम पंचायती | १ ग्राम पंचायत |
| (१०) | | २.५ हजार पेक्षा अधिक व ५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या: ३,३७५ | ३ ग्राम पंचायती | १ ग्राम पंचायत |
| (११) | | २.५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या: ११,५८७ | ३ ग्राम पंचायती | १ ग्राम पंचायत |

**(ब) विभागीय व जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांसाठी:**

| | | |
|---|---|---|
| (१) | सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विभागाचे विभागीय आयुक्त | २ |
| (२) | राज्यात सर्वोत्तम कामगिरी करणारे जिल्हाधिकारी | ३ |
| (३) | राज्यात सर्वोत्तम कामगिरी करणारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | ३ |

विभागीयस्तर (Division Level):

**(अ) स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी: (राज्यस्तरावरील विजेते सोडून)**

| **अ.क्र.** | **गट** | **लोकसंख्या निहाय गट** | **विभागीय सर्वोत्तम कामगिरी प्रत्येक विभागासाठी खालील प्रमाणे** |
|---|---|---|---|
| (अ) | **नागरी स्थानिक स्वराज्य संस्था : ४११** | | |
| (०१) | अमृत शहरे (४३) | १० लक्ष पेक्षा अधिक लोकसंख्या : १० | संपूर्ण अमृत गटासाठी १ |
| (०२) | | ३ लक्ष पेक्षा अधिक परंतु १० लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या : १७ | |

| | | | |
|---|---|---|---|
| (०३) | | १ लक्ष पेक्षा अक्षिक परंतु ३ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या : १६ | |
| (०४) | नगरपरिषद व नगर पंचायत (३६८) | ५० हजार पेक्षा अधिक परंतु १ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या : ४७ | १ |
| (०५) | | २५ हजार पेक्षा अधिक परंतु ५० हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ११८ | १ |
| (०६) | | १५ हजार पेक्षा अधिक परंतु २५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ९४ | १ |
| (०७) | | १५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : १०९ | १ |
| **(ब)** | **ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था : १६,३९८** | | |
| (०८) | ग्राम पंचायती | १० हजार पेक्षा अधिक लोकसंख्या: ३६६ | १ |
| (०९) | | ५ हजार पेक्षा अधिक व १० हजार पेक्षा कमी लोकसंख्या : १,०७० | १ |
| (१०) | | २.५ हजार पेक्षा अधिक व ५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या: ३,३७५ | १ |
| (११) | | २.५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या: ११,५८७ | १ |

**(ब) विभागीय व जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांसाठी: (राज्यस्तरावरील विजेते सोडून)**

| | | |
|---|---|---|
| (१) | विभागात सर्वोत्तम कामगिरी करणारे जिल्हाधिकारी ( प्रत्येक विभागातून एक) | ६ |
| (२) | विभागात सर्वोत्तम कामगिरी करणारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद विभागातून एक) | ६ |

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२२११०९१३३८१४३७०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANDIP S KAMBLE

Digitally signed by SANDIP S KAMBLE
DN: CN = SANDIP S KAMBLE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = ENVIRONMENT AND CLIMATE CHANGE DEPARTMENT
Date: 2022.11.09 15:14:15 +05'30'

**( संदिप कांबळे )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति :**

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

२) मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री, ग्राम विकास, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग विभाग, मुंबई
७) प्रधान सचिव, (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८) सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९) अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई
१०) विभागीय आयुक्त (सर्व)
११) आयुक्त, तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई
१२) जिल्हाधिकारी (सर्व)
१३) आयुक्त, सर्व महानगरपालिका
१४) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई
१५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१६) राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) मुंबई
१७) सह आयुक्त / उप आयुक्त, नगरपालिका शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
१८) सह आयुक्त / उप आयुक्त, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
१९) गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
२०) मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती (सर्व)
२१) ग्रामसेवक, ग्रामपंचायत (माझी वसुंधरा अभियानात समाविष्ठ सर्व)
२२) निवडनस्ती.